| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र शासन<br>आरोग्य विभाग<br>जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ | |
| कार्यालय<br>वयक्तिक<br>Email | ०२५१-२७०९४३२<br>०२५१-२७०८७३०<br>ulhasnagarcs@gmail.com | जा.क्र.मरुउ/भांडार/आंतर्गत संपर्क यंत्रणा देखभाल दुरुस्ती दरपत्रके//२६<br>दिनांक 17 /३ /२०२६ 4618-19 |

# जाहीर नोटीस (दरपत्रके आमंत्रण पत्र)

सुचित करण्यात येते की,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ या रुग्णालयाकडील सन-२०२६-२०२७ या कालावधीमध्ये रुग्णालयातील सर्व विभाग,वॉर्ड,कार्यालये यांच्याशी संपर्क करण्यासाठी कार्यरत असलेल्या अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणेच्या वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी व देखभाल दुरुस्ती कालावधीमध्ये सदर यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी किंवा वाढीव कामांसाठी लागणा-या साहित्यांचे सोबत जोडलेल्या यादीनुसार दर निश्चितीसाठी दरपत्रके मागविण्याचे निश्चित केलले आहे. तरी इच्छुक अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणेचे देखभाल दुरुस्तीचे काम करणारे व्यापारी यांनी बंद लिफाफामध्ये खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधीत (खालील अ.क्र.१६ नुसार) जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी. स्थानीक देखभाल दुरुस्ती सेवा धारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

=====================================================

**दरपत्रके सादर करणा-या देखभाल दुरुस्ती सेवा पुरवठा धारकांसाठी सर्वसाधरण अटी शर्ती**

१) इच्छुक अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या धारकांनी बाबनिहाय (Itemwise) दरपत्रके मोहरबंद लिफाप्यात सादर करावीत.यावर सदर जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर सादर केलेले आहे.त्याचे नांव असावे.

२) अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या धारक यांना बाबनिहाय फक्त ०१ दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये.असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबधाचा संघर्ष म्हणून समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील.उदा. जर दोन सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या कंपन्या एकाच बाबीसाठी/प्रकल्पासाठी/निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती जी "कंपनी एक्स"चा मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक असेल तीच व्यक्ती"कंपनी वाय" ची मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक नसावी.अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-यासाठी अधिकृत अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या सेवा धारक, ठोक व्यापारी यांना दरपत्रक सादर करता येतील.

३) दरपत्रकात अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-यासाठी आवश्यक असलेल्या बाबी बद्दलची सविस्तर माहीती जसे कंपनी, क्षमता व इतर बाबी नमुद करणे आवश्यक आहे.पुरवठादार,निर्माणकर्ते (Manufacturer)यांचे अधिकृत अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणारे व्यापारी असणेबाबतचे पत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्रमांक (GST Number) प्रमाणपत्र व पॅन कार्ड छायांकित प्रत सांक्षांकित करुन जोडावी.

५) संस्था/दुकान,साहित्य पुरवठा/विक्रि विषयक/सेवा पुरवठा विषयक वैध नोंदणी दाखला सोबत जोडवा.

६) दरपत्रके सादर करणेसाठी पत्ता/ठिकाण- जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

७) व्यापारी लिफाप्यामध्ये यादीमधील कंपनी, क्षमता यानुसार प्रती बाबनिहाय दर GST व इतर करांसह नमुद करावेत.

८) विहीत कालावधीत अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करण्यासाठी उपलब्ध न झाल्यास शासकिय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

९) विहीत नमुन्यातील वस्तु व सेवा कर (GST Number) सहीत देयके स्विकारण्यात येतील. दर हे GST व इतर सर्व करांसह हमाली,पोहच,स्थापीत करणे खर्चासहीत असावे.सर्व साहित्य मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ येथे पोहच करावी लागेल.तसेच पोहोच करतेवेळी त्याची गणना यादीनुसार करुन देणे बंधनकारक राहिल.

१०) मंजुर न्युनतम दरांवर देखभाल दुरुस्ती धारकास काम करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने सेवा घ्यावी लागल्यास फरकाची रक्कम न्युनतम दर धारकाकडुन वसुल केली जाईल.सर्व वस्तुंचे दर हे अधिकतम विक्री किमंतीपेक्षा (MRP) जास्त नसावेत.

११) वस्तू व सेवांच्या दराबाबत शासकिय खरेदी बाबतच्या मार्गदर्शक सुचना,शासन निर्णय, परिपत्रक यांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१२) मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर-३ या रुग्णालयाकडील अंतर्गत संपर्क (INTERCOM) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचा व साहित्याचा दर्जा हा सर्वोत्तम असावा. सदरील देखभाल दुरुस्ती सेवा आय.एस.आय मार्क दर्जाची किंवा त्यासमान दर्जाची असावी.

१३) अंतर्गत संपर्क (INTERCOM) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या धारकास कोणत्याही शासकीय विभागाने अंतर्गत संपर्क (INTERCOM) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम प्रक्रियेसाठी काळया यादीत टाकले नसल्याबाबतचे प्रमाणपत्र लिहुन देणे बंधनकारक आहे.

१४) दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांकापासून सात दिवस दिनांक 30/३/२०२६ संध्या.५.०० वाजेपर्यंत असेल (कार्यालयीन सुट्टी वगळुन) उशिरा प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१५) दरपत्रके उघडण्याची तारीख ०९/३ /२०२६ संध्या ०५.३० वा. किंवा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली जाईल.

१६) कोणतेही लेखी किंवा तोंडी कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपुर्ण अथवा अंशतःखरेदी प्रक्रिया रद्द् करण्याचे सर्व अधिकार मा.जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ यांनी राखून ठेवलेले आहेत.

१७) या रुग्णालयाकडुन मागणी केलेल्या बाबींचेच व्यापारी लिफाफात दर GST व इतर करांसह नमुद करावे.

१८) मान्य न्युनतम दर आदेश निर्गमित केल्यापासुन एक वर्ष (३६५ दिवस) कालावधीसाठी वैध राहतील.

17-03-26

(डॉ.मनोहर बनसोडे )
जिल्हा शल्यचिकीत्सक
मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

प्रत- या रुग्णालयाच्या नोटीस बोर्डावर डकवुन प्रसिध्दीसाठी .

NHM IT cell या वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी

# व्यापारी लिफाफा

**आंतर्गत संपर्क यंत्रणा देखभाल दुरुस्तीसाठी असलेली यंत्रणा व त्यांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक साहित्यांची यादी साहित्य**

रुग्णालयातील सर्व विभाग,वॉर्ड,कार्यालये यांच्याशी संपर्क करण्यासाठी कार्यरत असलेल्या अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीसाठी व देखभाल दुरुस्ती कालावधीमध्ये वाढीव कामांसाठी किंवा दुरुस्ती कामांसाठी लागणा-या साहित्यांची **साहित्य निहाय यादी**

| अ.क्र | रुग्णालयामधील intercom शी संबधित देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध असलेल्या बाबी | देखभाल दुरुस्तीसाठी प्रति ०१ नग वार्षीक दर | एकुण बाबींचा वार्षीक दर |
|---|---|---|---|
| १ | ४६ टेलिफोन बुथ | | |
| २ | ०१ स्कायलिंक इंटरकॉम मशिन | | |

| अ.क्र. | इंटरकॉम यंत्रणा दुरुस्तीसाठी किंवा वाढीव कामासाठी आवश्यक असलेल्या बाबी | प्रति नग/मिटर रक्कम (दर) |
|---|---|---|
| १ | टेलिफोन बुथ | |
| २ | केबल | |
| ३ | मदरबोर्ड ( Extension Card ) | |
| ४ | टेलिफोन सॉकेट | |

स्वाक्षरी

देखभाल दुरुस्ती सेवा पुरवठा धारकाचे संपुर्ण नाव---------------------------

देखभाल दुरुस्ती सेवा पुरवठा करणा-या संस्थेचे नाव----------------------

संस्थेचा संपुर्ण पत्ता ------------------------------------------------